**शपथेवर सुरु**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ८ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – सहा. फौजदार तुळशिराम भानुदास गिते,

वय – ५५ वर्षे,

नेमणुक – राहूरी पोलीस स्टेशन, ता. राहूरी, जि. अहिल्यानगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरुः–**

दि.०५/०८/२०२२ रोजी मी नेवासा पोलिस स्टेशनला पोलीस हेडकॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. गु.र.क्र.६८१/२०२२ चा तपास माझ्याकडे आला होता. फिर्याद, दैनीक अहवाल व जप्ती पंचनामा केलेबाबतचे दस्ताऐवज तपासाकामी माझ्याकडे देण्यात आले होते. तपास आदेश मला ठाणे अंमलदार श्री. कुदळे यांनी दिला होता. आता मला तपास ओदश दाखविण्यात आला. त्यावर श्री. कुदळे यांची सही आहे. ते माझे सहकारी असल्याने मी त्यांची सही ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याने त्यास **निशाणी क्र. ४२** देण्यात येते.

२. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तलवार जप्त केलेबाबतची मुद्देमालाची पावती फाडली. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४३** देण्यात येते. आरोपीस हजर राहणेबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ प्रमाणे नोटीस दिली. आता मला ती नोटीस दाखविण्यात आली. त्यावर माझी व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४४** देण्यात येते. जप्त तलवार मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला एम.ओ. – अ वरील तलवार दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यानंतर आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ जे. बी. इनामदार यांचेमार्फत सुरु–**

३. नेवासा पोलीस स्टेशनला व शहरात मी पाच वर्षे म्हणून नोकरी केली. हे म्हणणे खरे आहे की, मला नेवासा शहराची पुर्ण माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, शांतता कमिटीचे सदस्य आणि व्यापारी यांची देखील मला संपूर्ण माहिती होती. आरोपीचे घर हे लोकवस्तीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घराच्या आजूबाजूला दाट वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमालासारख्या तलवारी लग्नकार्यात वापरतात. हे म्हणणे खरे नाही की, अशा वस्तू झाड कापण्यासाठी वापरल्या जातात. हे म्हणणे खरे

नाही की, जप्त मुद्देमाल तलवार नाही कारण त्यास मुठ नाही. दोषारोप दाखल करण्यापुर्वी मी मा. जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतली नाही. जी.आर. असल्यामुळे परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. जी. आर. दोषारोपपत्रासोबत जोडला नाही. तो का जोडला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

४. मला आरोपीच्या घराच्या चतु:सिमा सांगता येतील. आरोपीच्या घराच्या पुर्वेस दुकान, पश्चिमेस रोड, दक्षिणेस व उत्तरेस काय आहे हे मला सांगता येणार नाही. आरोपीच्या घराचा उतारा मी घेतला नाही. उतारा का हस्तगत केला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. आजूबाजूच्या लोकांचे जबाब मी घेतले नाहीत. ते का घेतले नाहीत याचे कारण मी सांगू शकत नाही. क–हे साहेबांच्या मोबाईलवर आलेल्या व्हिडीओची क्लीप मी दाखल केली नाही. ती दाखल करण्याची आवश्यकता मला वाटली नाही. सदर व्हिडीओमध्ये हाच आरोपी आहे याबाबतचा मी पुरावा दाखल केला नाही. क–हे साहेबांचा जबाब मी घेतला नाही, कारण मला आवश्यकता वाटली नाही. क–हे साहेबांचा मोबाईल मी जप्त केला नाही, कारण मला आवश्यकता वाटली नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, शांतता कमिटीचे सदस्य व पोलीस यांच्यामध्ये काही वेळेस वाद होत राहतात. लेखी आदेशावर शिक्का, बक्कल नंबर का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, तपास आदेशावर श्री.कुदळे यांची सही नाही. सदर केसमध्ये पोलीस कर्मचा–यांव्यतिरीक्त इतर साक्षीदार तपासलेले नाहीत, कारण मला तशी आवश्यकता वाटली नाही. सर्व साक्षीदारांचे जबाब घटनेच्या दुस–या दिवशी ६ तारखेला नोंदवले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, हारूण शेख हा शांतता कमिटीचा सदस्य असल्याने त्याचे व पोलीस डिपार्टमेंटचे वाद होत होते त्यामुळे आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा तपास करून खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

स्वाक्षरीत/–

(**ए.एन.सरक**)

दिनांक–२२/०१/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,

नेवासा